# पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली

## जनसंपर्क शाखा

P.R.O Office, Gadchiroli
**Phone No. 07132223142 Address: SP Office,Gadchiroli**
**E-mail : Prospoffice.gadchiroli@gmail.com**


---

# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक ०८/११/२०१९

## अवैद्यरित्या दारु विकणाऱ्या महिला आरोपीस तीन वर्ष कारावास व २५,०००/- रुपये दंड

महाराष्ट्र शासनाने सन १९९२ पासुन गडचिरोली जिल्हा हा दारुबंदि जिल्हा म्हणुन घोषीत केला असतांना सुध्दा गडचिरोली जिल्हयातील काहि अवैध दारु विक्रेते हे शेजारील छत्तीसगड, मध्यप्रदेश तसेच सिमावर्ती गोंदिया, भंडारा, तसेच नागपुर जिल्हयातील अनुज्ञाप्तीधारक दारु विक्री दुकाणातुन दारुची खरेदी करुन चारचाकी तसेच दुचाकी वाहनाने आडमार्गाने बेकायदेशिर वाहतुक करुन स्थानिक चिल्लर दारु विक्रेत्यांना घरपोच दारुचा पुरवठा करीत असतात, अशा अवैध दारु विक्रेत्यांवर अंकुश बसावा याकरीता मा. श्री. शैलेश बलकवडे, पोलीस अधिक्षक अधिक्षक गडचिरोली यांनी गडचिरोली जिल्हयातील अवैध दारु, जुगार व इतर अवैध व्यवयांवर रेड करुन प्रभावीपणे कायदेशिर कारवाई करण्याची जबाबदारी जिल्ह्यातील पोस्टे/उपपोस्टे/पोमके तसेच स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविली आहे. सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडत असतांना दिनांक ०८/०७/२०१८ रोजी महिला आरोपी नामे लता अनिल चापले, वय ४० वर्ष रा. आठवडी बाजार, गडचिरोली ही आपल्या घरामध्ये विनापरवाणा अवैधरित्या दारु विक्री करीत आहे. अशी मुखबीरव्दारे खात्रीशीर माहीती मिळाल्याने पोलीस स्टेशन गडचिरोली येथील स्टॉफने घराची झडती घेतली. घरातील स्वंयपाक खोलीत एका पीशवी मध्ये प्रवरा डिस्टलरी देशीदारु रॉकेट संत्राकंपनीच्या २० निपा, किमंत १,२०० रुपयाचा दारु अवैध्यरित्या विक्रीकरीता मिळुन आल्याने सदर महीला विरुध्द पोस्टे गडचिरोली येथे अप.क्र. २८२/२०१८ कलम ६५ (ई) मुदाका अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता. व सदर गुन्ह्यांचा तपास सफौ/शशिकर चिचघरे यांनी तत्कालीन पोलीस निरीक्षक, श्री दिपरतन गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली योग्य रितीने तपास केले. सदर गुन्हा कलम ६५ (ई) मु.दा.का. अंतर्गत न्यायालयात दाखल करण्यात आले.

दिनांक ०७/११/२०१९ रोजी श्री एन.पी. वासाडे, प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी गडचिरोली यांच्या न्यायालयाने आरोपी विरुध्द सबळ साक्षपुरावा मिळुन आल्याने सदर महिला आरोपी लता अनिल चापले हीला कलम ६५ (ई) मु.दा.का. अन्वये सक्षम कारावासाची शिक्षा व २५,०००/- रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली.

तसेच सरकार तर्फे सहा. सरकारी अभियोक्ता सौ. मेघा आर. महाजन, कोर्ट पैरवी अधिकारी म्हणुन पोहवा/यशवंत मलगाम व कोर्ट मोहरर सुभाष सोरते यांनी योग्य रित्या काम पाहीले.